**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. ७ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – गणेश नामदेव सावंत, वय– ३५ वर्षे,**

**व्यवसाय – हार्डवेअरचे दुकान**

**रा. सावंत गल्ली, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०७ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

न्यु सावंत हार्डवेअर ॲण्ड पेन्टस् असे माझे दुकानाचे नाव आहे. मी माझे दुकानाचा प्रोप्रायटर आहे. मी प्रतिवादी बळीराम चिंचकर यांना ओळखतो. त्याने माझे दुकानातुन रंग खरेदी केलेले आहेत. चिंचकर याने मला रंग खरेदी केलेनंतर रक्कम दिलेली होती. मी त्यास रक्कम स्वीकारलेनंतर पावत्या दिलेल्या होत्या. सदर पावत्या आर्टिकल ई वरती आहे. आता मला अभिलेखावरील आर्टिकल ई व निशाण क्र.७४ वरील पावत्या दाखविल्या ह्या त्याच पावत्या आहेत ज्या मी प्रतिवादीला दिल्या होत्या. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या पावतीस **निशाण क्र. १२२** देण्यात येतो.

**प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०७ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. बी.आर.राऊत यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

हे म्हणणे खरे नाही की, न्यु सावंत हार्डवेअर ॲण्ड पेन्टस् या दुकानाचा कायद्यानुसार परवाना माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिलेल्या पावत्या वरती माझे दुकान चालविण्याचा शासकीय परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ग्राहकास आम्ही संभाळलेल्या पावती पुस्तकातील पावती देत असतो. हे म्हणणे खरे आहे की, ग्राहकास मुळ प्रत दिलेनंतर त्याची छायांकित कार्बनयुक्त प्रत आमचे कडे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी मुळ पावती पुस्तीका आज रोजी न्यायालयात आणलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाण क्र. ७४ व १२२ वरील पावत्या मुळ नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे दुकान ज्या भागात आहे त्याच भागात प्रतिवादी चिंचकर हे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, चिंचकर व माझे वडीलांची पूर्वीपासुनची ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चिंचकर यांना त्यांच्या सांगण्यावरुन निशाण क्र. ७४ व १२२ वरील

पावत्या तयार करुन दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व चिंचकरचे चांगले संबंध असल्याने मी त्यांनी सांगितले प्रमाणे साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, चिंचकर यांनी पावती मध्ये नमुद केलेला माल कुठे वापरला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी पुराव्यात खोटया बाबी न्यायालयात कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)

दि. १७–०३–२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा